# सागली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपलिका

विभाग सामान्य प्रशासन (मुख्य भांडार विभाग)

सर्क्युलर कोटेशन

जाहिर प्रकटन क्रमांक १/२०२४-२५ दिनांक: ३०/०७/२०२४ सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मुख्य भांडार विभागामार्फत महापालिकेच्या बाल मंदिर शाळेकडील मुलामुलींसाठी गणवेश खरेदी कामी दोन लिफाफा पध्दतीने जाहीर पध्दतीव्दारे निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा संच किंमत | बयाना रक्कम | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बाल मंदिर मधील मुलामुलींना गणवेश पुरविणेबाबत. अंदाजित रक्कम रूपये - ६१,४४०/- | ३५०/- | ६१५/- | मंजूर रकमेच्या ५ % | ३०दिवस |

**टिप :-**

१. बयाना रक्कम युनियिन बँक ऑफ इंडिया सांगली येथे खाते नंबर ४२४२०२०१०५०२७०८ वर चलनाने भरणेचा आहे.
२. निविदा प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी महानगपालिकेच्या सामान्य प्रशासन, भांडार विभागाकडे संपर्क साधवा.
३. संपूर्ण निविदा प्रक्रिया अर्ज विक्री भांडार विभागामध्ये होईल व सादरीकरण महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागातील पेटीमध्ये करणेचे आहे.
४. निविदा संचाची विक्री भांडार विभाग येथे प्रसिध्दीच्या दिनांकापासून फॉर्म फी भरण्याची पावती सादर केल्यानंतर कोरे निविदा फॉर्म दिनांक - ०५/०८/२०२४ अखेर सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत देण्यात येतील.
५. निविदा दिनांक - ०६/०८/२०२४ पर्यंत सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत सामान्य प्रशासन, बारनिशी विभागात देणेचे आहेत.
६. निविदा दिनांक - ०८/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कमिटीसमोर उघडल्या जातील.
७. या निविदेबाबतच्या शर्तीअटी भांडार विभाग येथे उपलब्ध आहेत.
८. कोणत्याही निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता सर्व निविदा नाकारण्याचा हक्क महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.
९. वरील कामाकरीता लिफाफा क्रमांक १ मध्ये शॉप ॲक्ट लायन्स व बयाना भरलेचे चलन जोडणे आवश्यक आहे. व लिफाफा क्र.२ मध्ये फॉर्ममध्ये प्रती नगास गणवेश दर देणेचा आहे.

जा.क्रं.मनपा/प्रशावि/सां./६/ ५ /२०२४-२५
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
दि. 30/07/2024

सही.
उपायुक्त,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## मुख्य भांडार विभाग

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका बाल मंदिर शाळेकडील मुलामुलींसाठी गणवेश खरेदी करणे कामी तीन लिफाफा पध्दतीने जाहिर प्रसिध्दीव्दारे निविदा दर मागविण्यात येत आहेत,त्याच्या शर्ती अटी खालीलप्रमाणे .

## शर्ती - अटी

१) निविदा तीन लिफाफा पध्दतीने देण्याच्या आहेत.तीन लिफाफयामध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहेत.

**अ लिफाफा क्रमांक १ :-**

१) वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (G.S.T.ragistration certificate) आणि G.S.T. –R3 लगतचा जोडपत्र.
२) बयाणा रक्कम भरलेली चलनाची प्रत
३) पॅनकार्ड झेरॉक्स प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भ्रत असेल तर संबंधीत कंपनी / भगीदारी संस्था यांच्या नावाचे पॅन कार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फार्म चे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावचे असावे.)
४) आवश्यक असलेस E.P.F. नोंदणी प्रमाणपत्र
५) मुंबई दुकाने व अधिनियम नुसार ग्राहय परवाना / उद्योग व आधार प्रमाणपत्र
६) अनुभाव – निविदाकाराने मागील तीन वर्षात शासकिय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये खालील प्रमाणे पुरवठा केलेले किंवा उत्पादन केलेले समतुल्य काम (समजुल्य काम म्हणजे निविदेमध्ये नमुद कामाचे स्वरूप व व्यापत्ती असेल त्याच क्षेत्रातील कामाचा अनुभव) केलेले असणे आवश्यक आहे (अनुभवासाठी निविदाकाराने प्रत्यक्ष काम केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
७) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र तसेच मागील वर्षाचे व्यवसायकर चलन.
८) निविदाकाराने निविदेसोबत सादर केलेल्या दस्तऐवजाची सत्यता दर्शविनारे रूपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञपत्र.
९) सदर शर्ती अटी फॉर्मवर स्वाक्षरी व शिक्का करुन लिफफा क्रमांक 1 मध्ये देणेचा आहे.

**ब लिफाफा क्रमांक २** यामध्ये फक्त निविदा दर भरलेला निविदा फॉर्म देणेचा आहे.

२) इकडील निविदा फॉर्ममध्येच निविदा दर (अक्षरी व अंकी) देणेचा आहे.

३) निविदा दरामध्ये कोणत्याही प्रकारचे खाडाखोड करणेची नाही.

४) निविदाधारकांनी कोणत्याही प्रकारची अट घालण्याची नाही.

५) निविदा धारकांचे EPF कायद्यानुसार नोंदणी प्रमाणपत्र व तदनुषंगिक पुढील सर्व कार्यवाही करणेबाबतची कागदपत्रे निविदासोबत जोडणेची आहे. * (लागू असेल तेथे)

६) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक GST/प्र.क्र.81/कराधान-1 दिनांक 19 ऑगस्ट 2017 यामधील नमूद मार्गदर्शक सूचनेनुसार G.S.T. ची अंमलबजावणी दिनांक 01 जुलै 2017 पासून सुरु केलेने G.S.T. अधिनियमानुसार कराची आकारणी होणार असलेने त्याबाबत G.S.T.च्या करासहीत करुन निविदा दर भरणेचा आहे. तसेच G.S.T बाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार व G.S.T. नोंदणी प्रमाणपत्र दिनांक 19 ऑगस्ट 2017 चे व त्यापुढे वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही

मक्तेदारावर बंधनकारक राहील.

७) निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे तपशिलास अनुसरुन दर देणेचा आहे.

८) निविदा संच सामान्य प्रशासन विभाग, येथे निविदा पेटीत टाकणेचे आहे.

९) लिफाफा क्रमांक १ मधील कागदपत्रे पूर्ण असल्याशिवाय आणि लिफाफा क्रमांक १ चे तीन मक्तेदार असल्याशिवाय दुसरा लिफाफा क्रमांक २ उघडला जाणार नाही.

१०) उक्त निविदा प्रक्रियेमधील सर्वात कमि दराच्या निविदा धारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा कमी असले तर सदर निविदा धारकाने दर कमी भरलेबाबत लेखी खुलासा मनपास देणेत यावा.
महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र. ०८/इमा-२ मंत्रालय मुंबई दि. २७/०९/२०१८ मधील तरतुद परिच्छेद क्र. ४.६ मधील तरतुदनुसार पर फॉरमन्स सिक्युरीटी डिपॉझीट रक्कम भरणे बंधन कारक राहील.

११) ज्यांचे नांवे निविदा मंजूर होईल त्यांनी समज मिळालेपासून सात दिवसात मंजूर रक्कमेच्या शेडा ५% सुरक्षा अनामत रोखीने मनपाच्या मुख्य भांडार विभागात भरणेचे आहेत आणि योग्य त्या मुद्रांकावर करारपत्र स्वखर्चाने करुन दिले पाहिजे करारपत्र पूर्ततेच्या हमीपोटी महापालिका क्षेत्रातील लायक जामीनदार देणेचा आहे. निविदाधारका कडून त्यांचे सचोटी व अनुभवाच्या जादा हमी पोटी एकूण मंजूर रक्कमेच्या शेकडा १०% पर्यंत जादा सुरक्षा अनामत मागण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

१२) निविदा उघडल्यानंतर वर्क ऑर्डर मिळेपर्यंतच्या कालावधीत आणि वर्क ऑर्डर दिल्यानंतर देखील कोणत्याही कारणास्तव मक्ता मागे घेता येणार नाही. अन्यथा भरलेली बयाणा व सिक्युरिटी रक्कम जप्त केली जाईल.

१३) माल पुरविण्याची ऑर्डर दिले तारखेपासून ३० दिवसात मक्तेदाराने स्व:खर्चाने माल मुख्य भांडार विभागात पोहोच केले पाहिजे अन्यथा त्यानंतर प्रत्येक दिवसासाठी रक्कम रुपये १००/ (अक्षरी शंभर मात्र ) प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१४) गणवेश पुरविण्याची कामगिरी करण्यापूर्वी बीलापोटी अॅडव्हान्स दिला जाणार नाही. अथवा तशी मागणी करता येणार नाही.

१५) मा. शासनसच्या महिला व बाल कल्याण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मविम-२००१/प्र.क्र.१६७/का-१०दिनांक ०३ ऑक्टोंबर, २००१ नुसार मविमचे नोंदणीप्रमाणपत्र सादर करणा-या महिला संस्थेने मागणी केल्यास आलेल्या कमी दराने एकूण कामापैकी ५०% काम त्या संस्थेकडून करून घेण्यात येईल. यासाठी सदर संस्थेने शर्ती अटींप्रमाणे कागदपत्राची पूर्तता करावी लागेल.

१६) टेंडरमधील अटी शर्थीत वाढ करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

१७) कोणत्याही निविदा स्विकारणे अथवा कोणतेही कारण न देता सर्व निविदा नाकारण्याचा हक्क महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

१८) गणवेश संच सामान्य प्रशास विभाग भांडार शाखेत जमा करणेचे आहे. गणवेशाची पडताळणी करण्याचा हक्क पार्टी नंबर १ यांना आहे.

वरील सर्व शर्ती अटी वाचून पाहिल्या असून त्या आम्हास मान्य आहेत.

**पुरवठाधारकांची सही / शिक्का**
**पूर्ण पत्ता -**

**उपायुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

**मसूदा मान्य**